महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : **एनओटी-३६१७/सीआर-१३०/२०२२/जाहिरात** **जाहिरात क्रमांक :११३/२०२२ ते ११६/२०२२**

# महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा - २०२२

जाहिरात क्रमांक ०७७/२०२२, दिनांक २९ जुलै, २०२२ नुसार आयोगामार्फत दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२२ रोजी आयोजित **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२२** मधून भरावयाच्या उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, कर सहायक तसेच लिपिक-टंकलेखक (मराठी/इंग्रजी) संवर्गाच्या दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालाआधारे संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता मुख्य परीक्षा खालीलप्रमाणे घेण्यात येतील :-

| अ. क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षा | वार व दिनांक | जिल्हा केंद्र |
|---|---|---|---|---|
| १ | -- | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा – २०२२ संयुक्त पेपर क्रमांक १ | शनिवार, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२३ | अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई व पुणे |
| २ | ११३/२०२२ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा – २०२२ पेपर क्रमांक २ लिपिक-टंकलेखक | शनिवार, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२३ | अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई व पुणे |
| ३ | ११४/२०२२ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा – २०२२ पेपर क्रमांक २ दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | शनिवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२३ | अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई व पुणे |
| ४ | ११५/२०२२ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा – २०२२ पेपर क्रमांक २ कर सहायक | शनिवार, दिनांक ०४ मार्च, २०२३ | अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई व पुणे |
| ५ | ११६/२०२२ | महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा – २०२२ पेपर क्रमांक २ उद्योग निरीक्षक | शनिवार, दिनांक ११ मार्च, २०२३ | अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई व पुणे |

**२**. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२.१ उद्योग ऊर्जा व कामगार विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **उद्योग निरीक्षक, गट-क, उद्योग संचालनालय (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | १ | -- | १ | -- | -- | २ | -- | -- | ४ | २ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | -- | १ | -- | १ | -- | -- | १ | -- | -- | ३ | १ | ४ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (३) माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (५) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |
| (६) अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| **२.२ गृह विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **दुय्यम निरीक्षक, गट-क, राज्य उत्पादन शुल्क (एकूण ९ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | १ | १ | १ | १ | -- | ३ | ८ | १ | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १ | -- | -- | १ | १ | १ | १ | -- | २ | ७ | १ | ८ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | १ |
| (३) माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (५) दिव्यांग | **एकूण १ पद -** स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | | | | | | | | | | | |
| (६) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२.३ वित्त विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **कर सहायक, गट-क, (एकूण ४८१ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५९ | २७ | १४ | १२ | १६ | ९ | ८७ | ८ | ४८ | २८० | २०१ | ४८१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २९ | १४ | ७ | ७ | ७ | ५ | ४४ | ४ | २३ | १४० | १०० | २४० |
| (२) महिला | १८ | ८ | ४ | ४ | ५ | ३ | २६ | ३ | १५ | ८६ | ६१ | १४७ |
| (३) **माजी सैनिक** | ९ | ४ | २ | १ | ३ | १ | १३ | १ | ७ | ४१ | ३० | ७१ |
| (४) खेळाडू | ३ | १ | १ | -- | १ | -- | ४ | -- | ३ | १३ | १० | २३ |
| (५) दिव्यांग | **एकूण १९ पदे** (०५ पदे - अंध/अल्पदृष्टी (Blind / Low Vision), ०५ पदे - कर्णबधिरता अथवा ऐकुयेण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), ०५ पदे - अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy, **०४ पदे** - स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness, ) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | | | | | | | | | | | |
| (६) अनाथ | **एकूण - ०५ पदे** | | | | | | | | | | | |
| **२.४ सामान्य प्रशासन विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **लिपिक-टंकलेखक (मराठी), गट-क, (एकूण ५१० पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५९ | ३० | १५ | १६ | २१ | १२ | ९६ | १० | ३५ | २९४ | २१६ | ५१० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २९ | १५ | ८ | ८ | १० | ५ | ४८ | ५ | १८ | १४६ | १०८ | २५४ |
| (२) महिला | १८ | ९ | ४ | ५ | ६ | ४ | २९ | ३ | १० | ८८ | ६५ | १५३ |
| (३) माजी सैनिक | ९ | ५ | २ | २ | ४ | २ | १४ | २ | ५ | ४५ | ३२ | ७७ |
| (४) खेळाडू | ३ | १ | १ | १ | १ | १ | ५ | -- | २ | १५ | ११ | २६ |
| (५) दिव्यांग | एकूण २१ पदे [ ०५ **पदे-** अंध/अल्पदृष्टी), ०६ **पदे** -कर्णबधिरता अथवा ऐकुयेण्यातील दुर्बलता, ०६ पदे - अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy , ०४ **पदे** - स्वमग्नता(सौम्य), विशिष्ट शिक्षण अक्षमता, मानसिक आजार तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व.] | | | | | | | | | | | |
| (६) अनाथ | एकूण - ५ पदे | | | | | | | | | | | |
| **२.५ सामान्य प्रशासन विभाग :-** | | | | | | | | | | | | |
| **लिपिक-टंकलेखक (इंग्रजी), गट-क, (एकूण ३१ पदे)** | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | २ | -- | १ | १ | -- | ७ | -- | ४ | १७ | १४ | ३१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | -- | १ | -- | १ | १ | -- | ३ | -- | २ | ८ | ७ | १५ |
| (२) महिला | १ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | ५ | ४ | ९ |
| (३) माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | २ | ५ |
| (४) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (५) दिव्यांग | एकूण ०१ पद अंध/अल्पदृष्टीकरीता | | | | | | | | | | | |
| (६) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

**३.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**४.१** पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबधित विभागांच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**४.२** महिला, खेळाडू , माजी सैनिक, दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**४.३** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याबाबत (Non-creamylayer) (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**४.४** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**४.५** एखादी जात/जमात अथवा घटक राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

**४.६** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.७** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ तसेच दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले वैध प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.८ समाजातील उन्नत व प्रगतगटामध्ये मोडत नसल्याबाबत तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे विहित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.९ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४.१० अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.११ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१२ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

४.१३ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

**४.१४ खेळाडू आरक्षण :-**

४.१४.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१४.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१४.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१४.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१४.५ मुख्य परीक्षेच्यावेळी अर्ज सादर करताना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**४.१५ दिव्यांग आरक्षण :-**

४.१५.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१५.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या संवर्ग/पदांच्या बाबतीत खालीलप्रमाणे संबंधित संवर्गाची पदे दिव्यांगांकरीता सुनिश्चित करण्यात आली आहेत:-

| अ.क्र. | पदाचे नांव | **शासन आदेश** | **दिव्यांगत्वाचा उपप्रकार** |
|---|---|---|---|
| १ | उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय | शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः इएसटी-३४१७/प्र.क्र.११९/उद्योग-३, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ | (1) B, LV<br>(2) D, HH,<br>(3) OA, OL, BL, OAL, LC, DW, AAV,<br>(4) ASD(M),SLD, MI<br>(5) MD involving (1) to (4) above |
| २ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांकः एमआयएस-१०२०/प्र.क्र.११७/राउशु-१, दिनांक २९ जुलै, २०२१ | (1) LC<br>(2) SLD,MI<br>(3) MD involving into (1) and (2) |
| ३ | कर सहायक | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः विकवि-१०२१/प्र.क्र.१३/वि.प्र.-४, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ | (1) B, LV<br>(2) D, HH<br>(3) OA, BA, BL, OL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>(4) ASD (M, MoD), SLD, MI<br>(5) MD involving (1) to (4) above |
| ४ | लिपिक-टंकलेखक | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःकअस-१३१९/प्र.क्र.७४/१४-ब, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ | (1) B, LV<br>(2) D, HH<br>(3) OA, OL, BL, BA, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>(4) ASD (M), SLD, MI<br>(5) MD involving (1) to (4) above |

४.१५.३ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.१५.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनानाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.१५.५ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार शिफारस करण्यात येईल.

४.१५.६ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती

४.१५.७ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४.१६ अनाथ आरक्षण :-**

**४.१६.१** अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**४.१६.२** अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**४.१७ माजी सैनिकांकरीता आरक्षण :-**

**४.१७.१** उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

**४.१७.२** माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

**४.१७.३ आवश्यक प्रमाणपत्र :-**

(१) **सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र:-**

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) **जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र:-**

उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असेल, त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे.

**५. वेतनश्रेणी :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर |
|---|---|---|
| १ | उद्योग निरीक्षक,उद्योग संचालनालय | S-१३ : ३५४००-११२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. |
| २ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | S-१२ : ३२०००-१०१६००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते |
| ३ | कर सहायक | S-८ : २५५००-८११००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते |
| ४ | लिपिक-टंकलेखक | S-६ : १९९००-६३२००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते |

**६. पात्रता :-**

**६.१** भारतीय नागरिकत्व

**६.२ वयोमर्यादा :-**

| अ. क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | |
| १ | उद्योग निरीक्षक, | ०१ नोव्हेंबर, २०२२ | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी+३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी + ३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | दुय्यम निरीक्षक, | ०१ नोव्हेंबर, २०२२ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८+सेवा कालावधी + २ वर्षे | ४३ सेवा कालावधी + २ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | कर सहायक | ०१ नोव्हेंबर, २०२२ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी + ३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी + ३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ४ | लिपिक-टंकलेखक | ०१ नोव्हेंबर, २०२२ | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी + ३ वर्षे | ४३ + सेवा कालावधी + ३ वर्षे | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**६.३ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- क्रमांक:एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अनुसार दिनांक ०१ मार्च, २०२० ते १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.**

**६.४** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**६.५ शैक्षणिक अर्हता :-**

**६.५.१** उद्योग निरीक्षक, गट-क संवर्ग वगळता इतर संवर्गासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**६.५.२** उद्योग निरीक्षक, गट-क संवर्गाकरीता शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे राहील :-

(१) सांविधिक विदयापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील किमान पदविका, किंवा

(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी.

**६.५.३** मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदविका/पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**६.५.४** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केलेली असली पाहिजे.

**६.५.५** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**६.६ कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी टंकलेखन अर्हता :-**

**६.६.१ कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे टंकलेखन अर्हता असणे आवश्यक आहे:-**

| कर सहायक | लिपिक-टंकलेखक | |
|---|---|---|
| | मराठी | इंग्रजी |
| मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण | मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. | इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |

**६.६.२** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता- बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

**६.७ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-**

**६.७.१** मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

**६.७.२** शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची विहित टंकलेखन अर्हता मुख्य परीक्षेकरीता अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक आहे.

**६.८ टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट (कर सहायक व लिपिक-टंकलेखक पदाकरीता):-**

**६.८.१** दिव्यांग उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**६.८.२** पात्र माजी सैनिक उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जून, २०१९ अन्वये त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**६.८.३** अनाथ उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.**८४**/१का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखन अर्हता अनिवार्य नाही.

**६.९ शारीरिक मोजमापे/अर्हता :-**

**दुय्यम निरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणा-या उमेदवारांकडे उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे:-**

| पुरुष | महिला |
|---|---|
| (१) उंची - किमान १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - किमान ७९ से.मी. आणि फुगवून त्यापेक्षा ५ से.मी. जास्त. | (१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) वजन- किमान ५० कि.ग्रॅ. |

**७. निवडप्रकिया :-**

**७.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**७.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल :-

(१) उद्योग संचालनालयातील उद्योग निरीक्षक, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०२१

(२) राज्य उत्पादन शुल्क विभागामधील दुय्यम निरीक्षक, (सेवाप्रवेश) नियम २००९

(३) विक्रीकर विभागातील कर सहायक, गट-क (सेवाप्रवेश) नियम २०१३

(४) लिपिक-टंकलेखक, गट-क(सेवाप्रवेश) नियम २०१८

**७.३** आयोगाच्या संकेतस्थळावर “ परीक्षेची परीक्षा योजना (Scheme of Examination) ” मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

**७.४** अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**८. परीक्षेचे टप्पे —**

**८.१ मुख्य परीक्षा - २०० गुण**

**८.२ टंकलेखन कौशल्य चाचणी - केवळ लिपिक-टंकलेखक तसेच कर सहायक संवर्गासाठी**

**८.३ मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**८.३.१**मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**८.३.२**मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील त्यांच्या प्रोफाईलद्वारे आयोगाने विहित केलेल्या पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

**८.३.३**संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन प्रत्येक संवर्ग/पदाच्या परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

८.३.४ संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक शैक्षणिक अथवा टंकलेखन अर्हता नसल्यास व शैक्षणिक अथवा टंकलेखन अर्हता, मुख्य परीक्षेकरीता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**८.४ संवर्गाचा पसंतीक्रम (केवळ लिपिक-टंकलेखक पदाकरीता):-**

**८.४.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पध्दतीने अर्ज सादर करताना लिपिक-टंकलेखक संवर्गापैकी ज्या संवर्गासाठी अर्ज केला आहे, तो संवर्ग (लिपिक-टंकलेखक मराठी अथवा इंग्रजी ) नमूद करणे आवश्यक आहे. तसेच, दोन्ही संवर्गासाठी अर्ज करावयाचा असल्यास त्याप्रमाणे नमूद करणे आवश्यक आहे.

**८.४.२** पसंतीक्रम दर्शविलेल्या संवर्गाकरीता टंकलेखनाचे विहित मर्यादेचे अर्हता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित संवर्गाचा पसंतीक्रम रद्द करण्यात येईल.

**८.४.३** संवर्गाचा पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी खालील अटींवर देण्यात येईल:-

(१) आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करतानाच अर्जामध्ये पसंतीक्रम नमूद करणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम दर्शविलेल्या संवर्गाकरीता टंकलेखनाचे विहित मर्यादेचे अर्हता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित संवर्गाचा पसंतीक्रम रद्द करण्यात येईल.

(३) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पसंतीक्रमामध्ये बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

**८.५ टंकलेखन कौशल्य चाचणी (केवळ लिपिक-टंकलेखक व कर सहायक पदाकरीता):-**

**८.५.१ दिव्यांग, माजी सैनिक तसेच अनाथ आरक्षणाचा** दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अशा उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

**८.५.२**लिपिक-टंकलेखक (मराठी), लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) तसेच कर सहायक या तीन संवर्गातील पदभरतीकरीता संगणक प्रणालीवर आधारित स्वतंत्र टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

**८.५.३** टंकलेखन कौशल्य चाचणी ही केवळ अर्हताकारी/पात्रता (Qualifying) स्वरुपाची असेल.

**८.५.४** लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाच्या भरावयाच्या पदांच्या तीनपट उमेदवार टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता पात्र ठरविण्यात येतील.

**८.५.५** लिपिक-टंकलेखक (मराठी), लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) व कर सहायक संवर्गाकरीता स्वतंत्रपणे टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येतील. कर सहायक संवर्गाकरीता मराठी व इंग्रजी या दोन्ही चाचणीमध्ये अर्हताकारी/पात्र (Qualifying) ठरणे आवश्यक असेल.

**८.५.६ टंकलेखन कौशल्य चाचणीचा तपशील :-**

| अ.क्र. | तपशील | | | निकष |
|---|---|---|---|---|
| (१) | चाचणीकरीता पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या | | | भरावयाच्या पदांच्या तीनपट |
| (२) | टंकलेखन कौशल्य चाचणीचे स्वरुप | | लिपिक-टंकलेखक (मराठी) | अर्हताकारी (Qualifying) |
| | | | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) | अर्हताकारी (Qualifying) |
| | | | कर सहायक | दोन्ही भाषेत अर्हताकारी (Qualifying) |
| (३) | चाचणीचे निकष | | | |
| | **टंकलेखन** | **शब्द प्रतिमिनिट** | **KDPH (Key Depressions Per Hour)** | **वेळ** |
| | इंग्रजी | ४० | १२००० | १० मिनिटे (दिव्यांग उमेदवार १५ मिनिटे) |
| | मराठी | ३० | ९००० | १० मिनिटे (दिव्यांग उमेदवार १५ मिनिटे) |
| (४) | टंकलेखनाची गती मोजण्याची पध्दत | | | मजकुर संगणकावर विहित कालावधीत टंकलिखित करण्याच्या उमेदवाराच्या अचूकतेवर |
| (५) | चुका/त्रुटी गणण्याचे प्रमाण | | | दोन दशांशपर्यंत |
| (६) | त्रुटी/चुका मोजण्याची पध्दती | | | एकूण कळ अवनमन (Key Depression) च्या शेकडा प्रमाणात |
| (७) | पात्रतेसाठी सीमांकन मर्यादा/रेषा | | अराखीव | ७% |
| | | | मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अनाथ व दिव्यांग | १०% |
| (८) | परिच्छेदाचे लेखन सांगणारा व्यक्ती (Passage Dictator) ची उपलब्धता | | | अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार(लागू असल्यास) |

**८.५.७** लेखनिक/सहायकाची मागणी करणा-या अंध/अल्पदृष्टी उमेदवारांना त्यांच्या मागणीनुसार परिच्छेदाचे लेखन सांगणारा व्यक्ती (Passage Dictator) उपलब्ध करुन देण्यात येईल. (लागू असेल त्याप्रमाणे)

**८.५.८** टंकलेखनातील त्रुटी/चुकांसंदर्भात एकूण कळ अवनमन (Key Depression) च्या शेकडा प्रमाणात त्रुटी/चुका पात्रतेसाठी ग्राह्य धरण्यात येतील.

**८.५.९** टंकलेखन कौशल्य चाचणी करीता उपस्थित उमेदवारांना संगणक/किबोर्ड/इत्यादी हाताळताना सुलभता व्हावी, याकरीता उमेदवारांना प्रत्यक्ष चाचणी सुरु होण्यापूर्वी १० मिनिटांची सराव चाचणी देता येईल. त्यानंतर ३ मिनिटांचा विश्रांतीकाळ राहील व तदनंतर १० मिनिटांची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात येईल.

**८.५.१०** टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता उमेदवारांना संबंधित भाषेतील परिच्छेद तसेच सदर परिच्छेदातील कळ अवनमन संख्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

**८.५.११** लिपिक-टंकलेखक (मराठी/इंग्रजी) व कर सहायक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार प्रस्तुत पदांकरीता टंकलेखन प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

**९. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

**९.१** मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना उमेदवारांकडून विहित पद्धतीने व विहित कालावधीत प्राप्त संवर्गाच्या/पदांच्या पसंतीक्रमाच्या आधारे तात्पुरती निवड यादी(Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

**९.३** तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out) ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ०७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**९..४** तात्पुरती निवड यादी तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा[Data] लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**९.५** पदभरतीकरीता " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये व विहित पद्धतीने करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार कोणत्याही परिस्थितीमध्ये केला जाणार नाही.

**१०. मुख्य परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत :-**

**१०.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**(एक)** आवश्यक असल्यास शैक्षणिक अर्हतेबाबत खाते अद्ययावत करणे. पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेव्यतिरिक्त इतर कोणत्याही माहिती /दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**(दोन)** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे .

**(तीन)** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**(चार)** जिल्हा केंद्र निवड करणे.

**१०.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**(एक)** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉरमेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १५ | टंकलेखनाचे प्रमाणपत्र (मराठी/इंग्रजी लागू असेल त्याप्रमाणे) | PDF | ५० | ५०० |

**(दोन)** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार तसेच प्रस्तुत अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**(तीन)** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**(चार)** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**१०.३ सर्वसाधारण :-**

**(एक)** अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

**(दोन)** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**(तीन)** अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१०.४ जिल्हा केंद्र निवड :-**

**एक)** अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**(दोन)** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

**(तीन)** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**(चार)** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**(पाच)**वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**१०.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-**

**१०.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :-**

**(एक)** अमागास - **रु. ५४४/-** **(दोन)** मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग - **रु. ३४४/-**

**(तीन)** माजी सैनिक - **रु. ४४/-**

**(चार)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(पाच)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**१०.५.२** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनवर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या पदांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

१०.५.३ परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

(एक) **ऑनलाईन पध्दतीने :-**

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

(दोन) **ऑफलाईन पध्दतीने :-**चलनाद्वारे

चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचे कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

१२.५.४ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

१२.५.५ विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१०.५.६ अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी १४.०० ते दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी २३:५९ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी २३:५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी २३:५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**११. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

**११.१** लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००//दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या ' **लक्षणीय (Benchmark)दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१'** तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**११.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**११.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**११.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**११.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

**११.६** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या " **दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना** " चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

**१२. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**१२.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**१२.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा.

**१२.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा .

**१२.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा.

**१२.१.४** लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली, १९९१ अथवा त्यानंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार एतदर्थ मंडळाची विहित गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**१२.१.५** पदाची विशिष्ट कर्तव्ये व जबाबदारी लक्षात घेऊन शारीरिक व तदनुषंगिक प्रशिक्षण.

**१२.२ परिवीक्षा कालावधी :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : परिवी.२७१४/प्र.क्र.३०२/कार्या-८, दिनांक २२ जून, २०२१ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार परिवीक्षा धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१२.३** उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

**१३. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१३.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१३.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**१३.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१३.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१३.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे..

**१४. परीक्षेस प्रवेश**

संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यात येईल.

**१५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील **" उमेदवारांकरीता माहिती "** विभागातील " **सूचना** " अंतर्गत **" सर्वसाधारण सूचना "** तसेच " **परीक्षा** " या सदराखालील " **परीक्षा योजना** " विभागातील " **महाराष्ट्र गट-क सेवा परीक्षा** " मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१६.** सदर अधिसूचना आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : २६ डिसेंबर, २०२२.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.